# प्रेस नोट दिनांक २२/०८/२०१९

गणेशोत्सव २०१९ मध्ये गणेशमुर्ती प्रतिष्ठापना व गणेश विसर्जन मिरवणुक प्रसंगी विविध गणेश उत्सव मंडळे ढोल ताशा पथक लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये एका मंडळा समोर किती ढोल ताशा पथके लावावीत व एका ढोलताशा पथकामध्ये किती वाद्ये व सदस्य असावेत यावरून तसेच एकाच ठिकाणी अधिक काळ वादनाची आवर्तने करणे तसेच प्रत्येक चौकामध्ये आवर्तन करण्याचा ढोल ताशा पथक व गणेश मंडळांकडून हट्ट धरणे यामुळे पोलीस प्रशासन व ढोल ताशा पथकातील प्रमुख व सदस्य, गणेश मंडळाचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्ष, संघटना यांचे नेते व कार्यकर्ते आणि पोलीस प्रशासन यांचेमध्ये तणाव निर्माण होण्याची दाट शक्यता असते. त्यावरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. यास प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून पुणे शहरामध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या ढोल ताशा पथकांच्या प्रमुखांना व त्यातील सदस्यांना निर्बंध घालने आवश्यक असुन, मा. उच्च न्यायालय, मुंबई मध्ये दाखल जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० मध्ये मा. न्यायालयाने वेळोवेळी आदेश देवून, ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन) अधिनियम, २००० तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतुदी नुसार ध्वनी प्रदुषणाचे नियंत्रण व नियमन करणेसाठी **डॉ.रवींद्र शिसवे (भा.पो.से.) पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त** अधिकारानूसार ढोल ताशा पथक, पथकाचे प्रमुख व त्यातील सदस्यांना, गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. एका ढोल ताशा पथकामध्ये कमाल ४० ढोल, १० ताशे, ६ झांज एवढयाच वाद्यांचा समावेश असावा. त्यापेक्षा अधिक वाद्यांचा वापर करण्यात येवू नये.

२. एका ढोल ताशा पथकामध्ये वादक व त्या सभोवतालचे सुरक्षा कडे करणाऱ्या व्यक्ती अशा मिळुन जास्तीत जास्त १०० सदस्यांचा समावेश असावा. त्यापेक्षा अधिक सदस्यांचा / व्यक्तिंचा एका ढोल ताशा पथकामध्ये समावेश नसावा.

३. ढोल ताशा पथकाने टोल वापरू नये.

४. प्रतिष्ठापना व विसर्जन मिरवणुकीमध्ये मानाच्या गणेश मंडळासोबत जास्तीत जास्त ०३ ढोल ताशा पथके व इतर गणेश मंडळांसोबत जास्तीत जास्त ०२ ढोल ताशा पथके वापरता येतील. यापेक्षा जास्त ढोल ताशा पथके वापरू नयेत.

५. गणेश मंडळा सोबत वापरण्यात आलेली ढोल ताशा पथके मिरवणुकीच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत तेच राहतील. मिरवणुक दरम्यान ढोल ताशा पथके बदलता येणार नाहीत.

६. एका ढोल ताशा पथकाला फक्त एकाच गणेश मंडळा सोबत विसर्जन मिरवणुकीत सहभागी होता येईल. सहभागी झालेल्या गणेश मंडळाचे विसर्जन झाल्यानंतर त्या मंडळासोबत असलेल्या ढोल ताशा पथकाला पुन्हा नव्याने दुसऱ्या गणेश मंडळासोबत सहभागी होता येणार नाही.

७. ढोल ताशा पथक मिरवणुक वेळेपुर्वी पोहचले नाही याकारणावरून कोणत्याही गणेश मंडळांना मिरवणुक थांबविता येणार नाही.

८. प्रत्येक ढोल ताशा पथकाने गणेश प्रतिष्ठापना / विसर्जन मिरवणुकीकरीता गणेश मंडळा सोबत सहभागी होण्याची व वादन करण्याची स्वतंत्र परवानगी घेणे बंधनकारक आहे. विनापरवानगी कोणत्याही ढोल ताशा पथकास विसर्जन मिरवणुकीत ऐनवेळी सहभागी होता येणार नाही व ढोल ताशाचे वादन करता येणार नाही.

९. गणेश प्रतिष्ठापना/विसर्जनाकरीता गणेश मंडळाला ज्या पोलीस अधिकारी यांचेकडून परवानगी देण्यात आलेली आहे. अशा मंडळासोबत वादन करण्याकरीता ढोल ताशा पथकांनी त्याच पोलीस अधिकारी यांचेकडून वेगळी परवानगी घ्यावी. परवानगी घेत असताना ढोल ताशा पथकातील सर्व सदस्यांची संपुर्ण माहिती संबधित अधिकारी यांचेकडे द्यावी. प्राधिकृत पोलीस अधिकारी यांचे खेरीज इतर पोलीस अधिकारी यांनी दिलेली परवानगी ग्राहय धरण्यात येणार नाही.

१०. ढोल ताशा पथकांनी परवानगी घेतलेल्या पोलीस अधिकारी यांचे स्वाक्षरीचे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकारी यांचे स्वाक्षरीचे ओळखपत्र पथकातील सर्व सदस्यांनी घेणे व ते मिरवणुकीच्या सुरवातीपासुन शेवटपर्यंत स्वत:जवळ बाळगणे अनिवार्य आहे. ज्या सदस्यांकडे ओळखपत्र नसेल अशा सदस्यांना प्रतिष्ठापना / विसर्जन मिरवणुकीत ढोल ताशा पथकामध्ये सहभागी होता येणार नाही व वादन करता येणार नाही.

११. ढोल ताशा पथकातील कोणत्याही सदस्याला ढोल किंवा ताशा सोबत घेवून विसर्जन मिरवणुकीच्या उलट दिशेने येता अगर जाता येणार नाही.

१२. प्रत्येक ढोल ताशा पथकाला ज्या मार्गावर व चौकात संबंधीत सक्षम अधिकाऱ्याने परवानगी दिली असेल, त्याच मार्गावर व चौकामध्ये पथकास २० मिनीटाचे वादन आवर्तन करता येईल. याव्यतिरिक्त कोणत्याही चौकामध्ये किंवा रस्त्यावर थांबून आवर्तन करता येणार नाही. तसेच विहीत चौकामध्ये देखील विहीत वेळेपेक्षा अधिक काळ आवर्तन करता येणार नाही.

सदरचे निर्बंध दि.०२/०९/२०१९ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून ते दि.१३/०९/२०१९ रोजीचे २२.०० वा. पर्यंत शासनाने सुट दिलेले दिवस खेरीज करुन उर्वरीत कालावधीसाठी लागू राहतील.

Scanned by CamScanner